Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

# Unit 6:
# Ethical Issues concerning Family and Sexual Morality
# घटक ६
# कुटुंब आणि कामनीति या संबंधातील नैतिक समस्या



## अभ्यासक्रम

६.१ विवाह आणि कुटुंब : पारंपरिक दृष्टीकोन, मार्क्सवादी दृष्टीकोन आणि स्त्रीवादी दृष्टीकोन.
६.२ वेश्याव्यवसाय, समलिंगी संबंध आणि आकस्मिक कामसंबध : कर्मठ आणि उदारमतवादी दृष्टीकोन

---

**प्रस्तावना** [1]

उपयोजित नीतिशास्त्र ज्या अनेक नैतिक समस्यांच्या प्रांतांची चिकित्सा करते आणि उपाय सुचवू पाहते त्या सर्व प्रांतातील अतिप्राचीन प्रांत म्हणजे मानवी कामसंबंधाची रचना. विवाह व कुटुंबसंस्थेमुळे मानवी कामसंबंधाचे स्वरूप जितके सरळ दिसते, तितके वास्तवात सरळ नाही. नैतिकतेचा प्रश्न जिथे अतिशय उग्र, वादग्रस्त, तापट आणि सर्वाधिक संवेदनशील बनतो ते हे क्षेत्र आहे.

विवाहसमंत संबंध म्हणजे नैतिक आणि विवाह बाह्य संबंध ( **विबास** ) [2] म्हणजे अनैतिक; असा प्रचंड ढोबळ पण कडक निकष असणारा हा लोकमान्य लोकप्रिय प्रांत आहे. "केवळ विवाहातच नैतिकता असते, असे नाही; तर इतर मानवी व्यवहारात सुद्धा अनैतिकता असते, त्याचाही विवाहाइतका गंभीर विचार केला पाहिजे", असा विचारच माणसाला सुचू देत नाही, इतका या प्रांतातील नैतिक निकषाचा विचार भयानक मजबूत, शक्तिशाली आणि मेंदू बंद करणारा असतो.

एखादी व्यक्ति कितीही लबाडी, गुन्हेगारी वृत्तीची असली पण *विबासवर्तन* करीत नसेल तर ती नैतिक व्यक्ति समजली जाते आणि एखादी व्यक्ति सचोटीची, प्रामाणिक, कर्तव्यकठोर असली पण *विबासवर्तन* करीत असेल तर ती व्यक्ति अनैतिक, ढोंगी मानली जाते. शिक्षण, उच्च प्रशिक्षण, समजूतदारपणा, अभिवृत्ती, शहाणपणा, प्रज्ञान इत्यादी काहीही नसलेल्या सामान्य माणसाचीही अशीच धारणा असते, असा माणूसही याच कल्पना घेऊन जगत असतो.

दोन व्यक्तीमधील कामसंबंध एका सूत्रबद्ध व्यवस्थेत बांधून टाकण्यासाठी लग्न आणि कुटुंबसंस्थेची रचना झाली. त्याचवेळी *विबासकृत* अनैतिकतेचा उगम झाला. पण मुळात कुटुंबसंस्थेतून सर्व संस्कृतीतील वर्ण, जात-जमाती आणि लिंगभेदाच्या शोषणाचा पाया रचला गेला, हे मात्र आपण विसरून जातो.[3]

---

[1] हेमाडे श्रीनिवास, "कामसंबंधाचे नीतिशास्त्र" , *तत्त्वभान* (साप्ताहिक सदर), दैनिक लोकसत्ता, १९ डिसेंबर २०१४, पान ६. इंडियन एक्स्प्रेस पब्लिकेशन्स, मुंबई

[2] 'विबास' या नावाची अरुण म्हात्रेची अंतर्मुख करणारी कविता आहे. *विवाह बाह्य संबंध*
http://shriniwashemade.yolasite.com/

[3] 'Family' आणि 'कुटुंब' या संस्कृत-मराठी या शब्दाचा मूळ अर्थ घरगुती गुलाम, वेठबिगार असा आहे.
(१) From Early Modern English *familie* (not in Middle English), from Latin *familia* (“the servants in a household, domestics collectively”), from *famulus* (“servant”)/*famula* (“female servant”): http://dictionary.reference.com/help/faq/language/e09.html November 5, 2014

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com


## लैंगिकतेचे तत्त्वज्ञान (The Philosophy of Sexuality)

ब्रह्मचर्य, हस्तमैथुन, विवाह, प्रजनन, गर्भनिरोधन, कपटप्रणयचेष्टा (flirting), लैंगिक स्वैराचार, जारकर्म, तात्पुरते कामसंबंध, लैंगिक छळ, पाशवी वर्तन, विनंती संभोग, आकस्मिक संभोग, भावनिक ब्लॅकमेलिंग, विनयभंग, बलात्कार तसेच वेश्यागमन, समलिंगी संबंध, जबरी संबंध, लिव्ह इन रिलेशनशीप , अगम्य आप्तसंभोग (incest – इन्सेस्ट = निकटच्या निषिद्ध नात्यांमधील लैंगिक संबंध किंवा विवाह), अश्लील साहित्यांचा उपभोग आणि विविध प्रकारच्या लैंगिक विकृती व लैंगिक आजार यांचा आणि या सर्व गोष्टींशी संबंधित असलेल्या इतर अनेक संकल्पनांचा अचूक शोध घेणारी, त्या संकल्पनांचे नेमके अर्थ निश्चित करणारी उपयोजित तत्त्वज्ञानाची (Applied Philosophy) शाखा म्हणजे **लैंगिकतेचे तत्त्वज्ञान (The Philosophy of Sexuality[4])** ही नवी विद्याशाखा होय. या संकल्पनांचे अर्थ निश्चित झाले की त्यांचा अभ्यासाचा, चिंतनाचा आणि त्याद्वारे मानवी आरोग्य व जीवन सुधारण्याचा मार्ग खुला होतो. हे महत्वाचे कार्य लैंगिकतेचे तत्त्वज्ञान करते. लैंगिकतेच्या तत्त्वज्ञानाची दोन गृहीततत्त्वे आहेत.

## लैंगिकतेच्या तत्त्वज्ञानाची (The Philosophy of Sexuality) दोन गृहीततत्त्वे [5]

(१) कामानंद व कामसमाधान मिळवून देणाऱ्या मानवी कृती आणि इच्छा शोधणे.

(२) या मानवी कृती आणि इच्छा केवळ कामानंद व कामसमाधान देणाऱ्या नसून नवी माणसे जगात आणणे, म्हणजे मानवजात टिकविणे, याच्याशी निगडीत आहेत, हे लक्षात आणून देणे.

लैंगिकतेचे तत्त्वज्ञान वरील संकल्पनांचा व अनुषंगिक मुद्द्यांचा (अ) सांकल्पनिक आणि (ब) आदर्शवादी [6] असा दोन प्रकारचा शोध घेते.

(अ) सांकल्पनिक शोध म्हणजे कामेच्छा आणि कामकृती या मूलभूत कल्पना स्पष्ट करणे, त्यांच्या व्याख्या, मर्यादा, त्यातील भावी संशोधन यांचे विश्लेषण करणे. जसे की एखादी इच्छा कामेच्छेत रुपांतरीत होते म्हणजे नेमके काय घडते किंवा फसवून कामोपभोग घेणे आणि अहिंसक बलात्कार या संकल्पना व

---

(२) कुटुंब = "घरातील माणसे, पत्नी. कुट,कुल. कुटम. कुटुंबी हा शब्द ऑस्ट्रोएशियाटिक असल्याचे प्रिझुलुस्की सांगतो. याचे दोनदा संस्कृतीकरण झाले. कु + स्तुंब > कुटुंब, नंतर तो मराठीत तत्सम म्हणून सामावला. प्रथम जमिनीची मशागत करणारा, मग त्यावर निर्वाह करणारी माणसे – स्त्री-मुलेबाळे इत्यादी." : मराठी व्युत्पत्ती कोश, कृ. पां. कुलकर्णी पान १८७ शुभदा सारस्वत, पुणे २००४. ही व्युत्पत्ती पाहता मशागत करणारी माणसे म्हणजे कुळे ही कुटुंब झाली. (प्राचीन ग्रीक काळात गुलाम हा कुटुंबाचाच भाग असे.) त्यात सर्व स्त्री-पुरुष यांचा समावेश झाला. त्यानंतर कुणाकडे किती कुळे म्हणजे किती कुटुंबे काम करतात, त्यावरून तालेवारी निश्चित केली जात असावी. परिणामी जमिनीची मशागत करणे याचा अर्थ विस्तार होऊन 'कुल' म्हणजे कुटुंबाची परंपरा बनली असावी. 'कुलवधू' = साऱ्या कुळांची मालकीण किंवा साऱ्यांची सून बनली असावी. पुढे कुटुंबातील कोणतीही व्यक्ति, विशेषतः स्त्री = कुटुंब असे समीकरण बनले असावे. तिला पाश्चात्य अर्थाने वेठबिगार हा अर्थ चिकटला. पुरुष प्रधान व्यवस्था पहाता स्त्री हि पुरुषाची वेठबिगार असते !

(३) "ज्ञानकोशकार' श्री. व्यं. केतकर म्हणतात, " या शब्दाची व्याख्या काय करावी असा प्रश्नच येतो. सांपत्तिक दृष्ट्या म्हणजे कांहीं वस्तूंच्या मालकीचें अधिष्ठान या दृष्टीनें व्याख्या करूं लागलों तर विवाहित अविवाहित असा भेद करावा लागेल. शिरोगणतीकारांनीं एकत्र वस्ती हें कुटुंबाचें मुख्यत्व मानून हॉटेल हें एक कुटुंब धरलें आहे.". महाराष्ट्रीय ज्ञानकोश – श्री. व्यं केतकर http://ketkardnyankosh.com/index.php/2012-09-06-10-41-48/5970-2013-01-24-09-47-52

[4] Internet encyclopedia of Philosophy - http://www.iep.utm.edu/sexualit/ December 15, 2014
[5] http://en.wikipedia.org/wiki/Philosophy_of_sex
[6] Internet encyclopedia of Philosophy - http://www.iep.utm.edu/sexualit/ December 15, 2014

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---



त्याप्रमाणे होणारी कृती यात नेमका फरक काय आहे ? यांचे विश्लेषण करणे. (उदाहरणार्थ बर्ट्रांड रसल् चे मत लग्नाबद्दलचे मत.)

(ब) आदर्शवादी शोध म्हणजे कामेच्छा, कामकृती व कामसमाधान यांच्या नैतिक मूल्यमापनाची कसोटी रचणे. या कसोट्या शोधणे, रचणे, त्यांच्या समर्थनाचे युक्तिवाद रचणे हे मोठ्या जिकीरीचे, अवघड आणि नाजूक काम असते.

## लैंगिकतेच्या तत्त्वज्ञानाचे दोन हेतू

थोडक्यात, लैंगिकतेचे तत्त्वज्ञान दोन हेतू सांगते.

(१) पहिला- मानवी जीवन गुणवान, शुभ पातळीला नेण्यात मानवी लैंगिकता कोणते योगदान देते आणि कामकृती करताना कोणती नैतिक बंधने पाळणे आवश्यक व अनिवार्य आहे, याची मांडणी करणे.

(२) दुसरा - आपली कामकृती व आपले कामसमाधान साधताना समाजातील इतरांशी संवाद कसा करावा, त्याकरीता कोणती नैतिक जबाबदारी पार पाडावी याची मांडणी करणे.

## कामसंबंधाचे नीतिशास्त्र (Sexual Morality)[7]

या दोन्ही हेतूमधून कामसंबंधाचे नीतिशास्त्र (Sexual Morality) निष्पन्न होते. मानवी लैंगिक वर्तनाचा समावेश असलेल्या मानवी लैंगिकतेच्या सर्व पैलूंचे परीक्षण नैतिक दृष्टीकोनातून करणारी नीतिशास्त्राची शाखा म्हणजे कामसंबंधाचे नीतिशास्त्र. (Sexual Ethics/Sex Ethics/Sexual Morality) विवाहपूर्व, विवाहोत्तर, विवाहित स्थितीतील लैंगिकसंबंधातून लिंगभेद आणि सत्तास्पर्धा कशी व्यक्त होते, त्याचा वेध हे नीतिशास्त्र घेते. व्यक्तिगत आणि व्यापक सामाजिक आरोग्यावर लिंगभेद आणि सत्तास्पर्धा कशी परिणाम करते, याचाही शोध यात घेतला जातो.

कामसंबंधाचे नीतिशास्त्र तीन भूमिका मुख्यत्वे मांडते :

**(१) नैतिक शून्यवाद** (मुळात चांगले आणि वाईट असे काहीच नसते, सारे निरर्थकच असते, असे समजणे)

**(२) नैतिक सापेक्षतावाद** (नैतिकता व्यक्ति, परिस्थिती, संस्कृती देशकालसापेक्ष असते. त्यातून सार्वत्रिक नियम बनविता येत नाहीत, असे समजणे)

**(३) नैतिक सार्वत्रिकवाद** (नैतिकता सार्वत्रिक असते आणि ती सक्तीचे असते, असे समजणे).

या शिवाय सुखवाद, उपयुक्ततावाद, कर्तव्यवाद, व्यक्तिवाद, उदारमतवाद (परस्पर सहमतीने होणारा कामसंबंध नैतिकदृष्ट्या समर्थनीय मानणे) आधुनिकतावाद (परस्पर सहमतीने, कृतीची पूर्ण जाणीव असणारा, बांधिलकी मानणारा आणि प्रेमभावनेने युक्त असणारा कामसंबंध नैतिकदृष्ट्या समर्थनीय मानणे) हे आणखी नैतिक सिद्धांत आहेत.

या प्रकरणात आपण कामसंबंधाचे नीतिशास्त्र किंवा लैंगिक संबंधाचे नीतिशास्त्र या व्यापक क्षेत्रातील काही निवडक संकल्पनांचा शोध घेणार आहोत. त्यासाठी स्टीवन लूपर आणि कर्टीस ब्राऊन (Steven Luper, Curtis Brown) या अमेरिकन लेखकांच्या "The Moral Life"[8] या ग्रंथातील *Marriage And Family* आणि *Sexual Morality* या दोन प्रकरणातील मांडणीचा आधार घेऊ. त्यांच्या मते, कामसंबंधाचे नीतिशास्त्र मुख्यतः तीन समस्यांच्या अभ्यासाशी निगडीत आहे.

---

[7] ALAN H. GOLDMAN, "Sexual Ethics", http://philosophicalinvestigations.co.uk/index.php?view=category&id=56%3Asexual-ethics&option=com_content&Itemid=54.

**8** Luper Steven, C. Brown (Ed.). (1999). The Moral Life, 2nd Edition. USA: Trinity University, Harcourt Brace College Publishers.

---



***Steven Luper***

Both @
Department of Philosophy
Trinity University
One Trinity Place
San Antonio
USA



***Curtis Brown***



## कामसंबंधाच्या नीतिशास्त्रातील तीन समस्या

1) कामभावना आणि प्रेम यांच्यातील संबंध
2) वेश्याव्यवसायाचा नैतिक दर्जा
3) समलिंगी संबंध : स्त्री (लेस्बियन Lesbian) व पुरुष (होमोसेक्सुएल Homosexual)

आधी आपण विवाह या संस्थेचे स्वरूप पाहू. –

## ६.१ विवाह आणि कुटुंब : पारंपरिक दृष्टीकोन, मार्क्सवादी दृष्टीकोन आणि स्त्रीवादी दृष्टीकोन.

### विवाह आणि कुटुंब रचना

नैतिकदृष्ट्या विवाह संबंध आणि कुटुंब रचना हा महत्वाचा आणि अतिशय वादग्रस्त मुद्दा आहे. आधी नमूद केल्यानुसार अनैतिक संबंध याचा अर्थ विवाहबाह्य लैंगिक संबंध असाच केला जातो. नीती केवळ विवाहातच असते, असा समज आहे. अर्थातच तो गैरसमज आहे.[9]

स्टीवन लूपर आणि कर्टीस ब्राऊन यांच्या मते, विवाहासंबंधात दोन नैतिक मुद्द्यांचा विचार करणे आवश्यक आहे. किंबहुना, समस्यांचे दोन गट विचारात घ्यावे लागतात. ते असे :

1) विवाहित स्त्री-पुरुषांमधील संबंध.
2) मुले आणि पालक यांचे संबंध

पहिला गट म्हणजे विवाहित स्त्री-पुरुषांमधील संबंध हा 'विवाह/लग्न' या घटनेशी; तर दुसरा गट म्हणजे मुले आणि पालक यांचे संबंध 'कुटुंब' या रचनेशी संबधित आहे. या दोनपैकी 'विवाह/लग्न' या घटनेतून दोन प्रकारच्या नीतिशास्त्रीय समस्या उद्भवतात.

**पहिला प्रकार** : एक सामाजिक संस्था म्हणून विवाह संस्थेचे मूल्य.
**दुसरा प्रकार :** 'लैंगिक कृती केवळ विवाहाच्या चौकटी पुरतीच मर्यादीत असावी' अशी कल्पना.

वरील पैकी पहिला गट आपण येथे विचारात घेऊ. म्हणजे विवाहित स्त्री-पुरुषांमधील संबंध. मुले आणि पालक यांचे संबंध हा गट तूर्तास बाजूला ठेऊ.

---

9 अर्थात विवाह आणि कुटुंब हे नैतिकतेचे एकमेवाद्वितीय क्षेत्र नव्हे, ते नीतीच्या अनेक क्षेत्रांपैकी एक आहे. पण विवाहास अतिरिक्त महत्त्व देवून ती जणूकाही इतर सामाजिक नीतीची रचना केली जाते. हे खरे तर नैतिकता या संकल्पनेचे अवमूल्यन आहे.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com


---

समाधान किंवा कृती ही केवळ विवाहाच्या चौकटी पुरतीच मर्यादीत असावी की ती चौकट ओलांडून सुद्धा हे समाधान मिळवावे ? असे सुख मिळविण्याचा नैतिक आधार काही असेल तर त्याचे स्वरूप काय असेल, त्याचे निकष कोणते आणि ते अनैतिक असेल तर त्याचे स्वरूप काय असेल, त्याचे निकष कोणते असतील किंवा आहेत ?

स्टीवन लूपर आणि कर्टीस ब्राऊन यांनी *Marriage And Family* या प्रकरणात विवाहाबाबत चार दृष्टीकोन मांडले आहेत. अद्‌भुतरम्यतावादी(Romantic), करार पद्धती (Contractual), पारंपरिक (Traditional) आणि मार्क्सवादी (Marxist).

यातील अद्‌भुतरम्यतावादी आणि करार पद्धतीवर टीका करताना दोन दृष्टिकोनांचा विकास झाला. ती दोन बाजूंनी टीका झाली. पहिली टीका पारंपरिक दृष्टीकोनाचे समर्थन करण्यासाठी तर दुसरी टीका मार्क्सवादी दृष्टीकोन तसेच स्त्रीवादी दृष्टीकोन मांडण्यासाठी झाली. सहाजिकच पहिल्या पद्धतीस **पारंपरिक दृष्टीकोन** आणि दुसऱ्या पद्धतीस **मौलिक दृष्टीकोन म्हणतात.** अशा रीतीने आपणास तीन रिती मिळतात.

१ ) विवाह आणि कुटुंबासंबंधी पारंपरिक दृष्टीकोन **(Traditional View)**

२) ) विवाह आणि कुटुंबासंबंधी मार्क्सवादी दृष्टीकोन **( Marxist View)**

३) ) विवाह आणि कुटुंबासंबंधी स्त्रीवादी दृष्टीकोन **( Feminist View)**

विवाहाच्या अद्‌भुतरम्यतावादी आणि करार पद्धती दृष्टीकोनाविरुद्ध पारंपरिक दृष्टीकोन मांडण्यात येतो. अद्‌भुतरम्यतावादी दृष्टीकोन सोरेन किर्केगार्द[10] (१८१३-१८५५) या डॅनिश तत्त्ववेत्त्याने त्याच्या या ग्रंथातील **"The Aesthetic Validity of Marriage"** या प्रकरणात मांडला. आणि करार पद्धतीवर रॉजर स्क्रूटन[11] (१९४४ ...) यांनी त्याच्या ***Politics of Sex*** या लेखात टीका केली आहे. त्या टीकेतून करार पद्धतीचे स्वरूप समजते. त्यामुळे आधी आपण करार पद्धतीचे स्वरूप थोडक्यात पाहू, मग इतर पद्धतींचे स्वरूप पाहू.

**करार पद्धतीचे स्वरूप:**

या पद्धतीनुसार विवाहित स्त्री-पुरुषांमध्ये झालेल्या निखळ करारातील कलमांनुसार त्या जोडप्याच्या जीवनात बांधिलकी निश्चित होते. ती अपोआप निश्चित होत नाही. पण लग्नाचा समारंभ साजरा केला म्हणून केवळ जादू घडावी तशी यापूर्वी नसलेले नैतिक बांधिलकीचे सेतू त्या जोडप्यात निर्माण होतात, असे मात्र नाही. बांधिलकीचा उगम करार हाच असतो. कोणत्याही एकावर येणारी जबाबदारी ही केवळ त्यांनी एकमेकांशी काही विशिष्ट स्वरूपाचा करार केला आहे, म्हणूनच येते, हे महत्वाचे आहे.

## १ ) विवाह आणि कुटुंबासंबंधी पारंपरिक दृष्टीकोन (Traditional View)

पारंपरिक दृष्टीकोनाचे समर्थन करण्यासाठी स्क्रूटन पुढीलप्रमाणे टीका करतो. त्याच्या मते,' असे करारी वैवाहिक जीवन यशस्वी व्हावयाचे असेल तर किमान तीन गोष्टी कराव्या लागतील,–

**(अ)** एकमेकांचे हित सांभाळले जाईल याची खात्री देणारे शक्य होईल तितके सुस्पष्ट कलमे करावीत.

**(ब)** करारच असल्यामुळे त्यात कालबद्धता आणता येते. हवे तेंव्हा तो संपुष्टात आणता येईल. मुलांची जबाबदारी त्यांनी वाटून सामंजस्याने घ्यावी. त्याचा करार करावा.

**(क)** प्रत्येक जोडप्याच्या गरजा, इच्छेप्रमाणे कराराचे स्वरूप बदलेल. एका ठराविक छापाचा असणार नाही.

---

10 सोरेन आबे किर्केगार्द Søren Aabye Kierkegaard (०मे १९१३ ते ११ नोव्हेंबर १८५५) धर्मज्ञ, कवी, सामाजिक टीकाकार आणि पहिला अस्तित्ववादी तत्त्ववेत्ता.

11 रॉजर वेरनोन स्क्रूटन (२७ फेब्रुवारी १९४४ ... विद्यमान) ब्रिटीश तत्त्ववेत्ता. त्याने जवळपास तीस ग्रंथ लिहिले.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar

Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---



**Roger Vernon Scruton**.
Born 27 February 1944.. (age 72)
An English philosopher,
Specialises in Aesthetics
Buslingthorpe, Lincolnshire,
England



स्क्रूटन आता, पारंपरिक दृष्टीकोन मांडतो. तो असा :

स्क्रूटनच्या मते, लग्न करणे, या कृतीतून आपण अनेक प्रकारच्या बांधिलकी, कर्तव्ये व जबाबदारी मान्य करीत असतो. येथे बांधिलकी येते ती केवळ त्या जोडप्याने लग्न केले आहे, याच कारणामुळे; मग ती बांधिलकी त्यांना मान्य असो अथवा नसो. त्यांनी एकमेकांशी लग्न करण्यास मान्यता दिली की सारी जबाबदारी येतेच कारण लग्न ही अनेक शतके रूढ झालेली, विकसित होत आलेली सामाजिक संस्था आहे. बरे, कितीही सुस्पष्ट व निःसंदिग्ध करार केला तरी काही गोष्टी राहतातच. उदाहरणार्थ,-

१) असा करार भविष्यकालीन घटनांचे अंदाज बांधू शकत नाही. त्यामुळे त्यांची जबाबदारी घेण्याचा मुद्दा निर्माण होतो. समजा, पत्नीला काही गंभीर आजार झाला तर ... ?! "असा काही आजार होईल, हे करारात नव्हते त्यामुळे मी याचा उपचार करणार नाही" असे पती म्हणू शकतो का ? जबाबदारी, कर्तव्य यांची निश्चिती करार पद्धतीत होऊ शकत नाही, हा मुख्य आक्षेप आहे. ही कसर पारंपरिक विवाह पद्धतीत भरून निघते. या रितीने लग्न केल्यास पती-पत्नी सारीच जबाबदारी घेतात, कर्तव्ये करतात. त्यामुळे परंपरा महत्वाची असते.

२) विवाह टिकवायचा असेल तर विवाहाची एक सर्वमान्य कल्पना असली पाहिजे. आणि पतीपत्नीसही ती मान्य असली पाहिजे, तरच विवाह होऊ शकतो. सर्वमान्य असणे याचा अर्थ विवाह करण्याची रिती लोकांना कबूल असावी, ते साक्षीदार असावेत. याचाच अर्थ विवाह ही सामाजिक संस्था असली पाहिजे. जे या संस्थेत प्रवेश करू इच्छितात त्या साऱ्यांना लोकमान्यता मिळते, त्यांच्यावर बांधिलकी येते, जबाबदारी व कर्तव्ये अपरिहार्य ठरतात. असे फक्त पारंपरिक विवाह पद्धतीत होऊ शकते, म्हणून हीच पद्धत योग्य आहे.

अशा रीतीने बांधिलकीचे स्वरूप दोन प्रकारचे असते. **अपरिहार्यता** आणि **सर्वमान्यता**. म्हणून पारंपरिक विवाह पद्धती स्वीकारली पाहिजे.

३) करार पद्धतीत विवाहबाह्य संबंधाचे स्वरूप निश्चित होत नाही. असे संबंध नैतिक की अनैतिक हे कसे ठरणार ? तर करार ज्या शब्दात, नियम, अटी यांनी बनलेला असेल त्यावर ते ठरणारा. जर असे संबंध करावयाचे नाही असे ठरले आणि केले की करार मोडला असे होईल! जर असे संबंध करावयाचे असे ठरले आणि केले नाही तरी करार मोडला असे होईल! पण मग असा दुसरा करार केला तर विवाह करावयाचाच कशाला ? कारण विवाह लैंगिक संबंधासाठी असतात. तेच जर विवाहबाह्य करावयाचे असा करार कसा काय होऊ शकेल ? हा पेच आहे. असे पेच पारंपरिक विवाहात निर्माण होत नाहीत. म्हणून तीच पद्धत योग्य आहे.

४) करार पद्धती विवाहाची सामाजिकता नाकारते आणि विवाह ही घटना केवळ व्यक्तिगत पातळीवर आणून या सनातन संस्थेचे अवमूल्यन करते. ही स्क्रूटनच्या मते फार मोठी चूक आहे.

---



Susan Moller Okin,
Liberal feminist
Political philosopher
And author.
Auckland, New Zealand
(July 19, 1946, March 3, 2004)



**मौलिक विवाह पद्धती**

मार्क्सवादी आणि स्त्रीवादी विचारवंतानी मात्र करार पद्धती आणि पारंपरिक विवाह पद्धती या दोन्ही रितीमधील दोष, शोषण, अन्याय, त्रुटी दाखवून दिल्या. त्यांनी दोन्ही रिती समान अन्यायकारक आहेत, असे सिद्ध करून नवा मौलिक दृष्टीकोन मांडला. त्यांच्या मते, विवाह ही जितकी प्राचीन सामाजिक संस्था आहे तितकीच ती प्राचीन शोषक संस्था आहे. स्त्री-पुरुष विषमता आणि स्त्रीचे शोषण हाच या संस्थेचा प्राचीन हेतू आहे.

करार पद्धतीसुद्धा पुरुष प्रधानच संस्था असून ती प्राचीन शोषणाची परंपरा चालविते. सकृतदर्शनी जरी स्त्रीला कराराचे स्वातंत्र्य आहे असे दिसत असले तरी तिला स्वातंत्र्य मुदलातच नसते. स्त्री ही दुर्बल लिंग समजली जाते आणि त्या दुर्बलतेचा फायदा पुरुष नेहमी घेतो. फ्रेडरिक एंगल्स या मार्क्सवादी विचारवंताच्या मते, सर्व खासगी मालमत्तेचा हक्क संपुष्ट आला की खऱ्या स्त्रीला अर्थाने स्वातंत्र्य मिळेल. शीला क्रोनन (Sheila Cronan)[12] या विदुषीच्या मते खरे तर कुटुंब ही संस्था स्त्रियांना गुलाम बनविणारी आहे, हे तर उघडच आहे. पण ती मूलतःच शोषक असल्याने ती संस्था पूर्णपणे नष्ट केली पाहिजे.

सुसान मोलर ओकिन (Susan Moller Okin) या स्त्रीवादी विदुषीच्या मते, करार पद्धतीप्रमाणे पारंपरिक विवाह पद्धतीसुद्धा स्त्रियांवर अन्यायकारकच आहे. करारात स्त्रिया जरी समान हक्क पातळीवर आल्या असे वाटले तरी त्या स्वतःचे कल्याण करून घेऊ शकतीलच असे नाही. पुरुषप्रधान संस्कृती त्यांना गिळंकृत करते. त्यात पुरुषी झालेल्या स्त्रिया इतर स्त्रियांचे शोषण करण्यासाठी पुरुषांना मदत करतात. त्यामुळे स्त्रियांना केवळ पुरुशाविरुध्द नव्हे तर स्त्रियांविरुद्ध ही लढावे लागते. म्हणजे हा स्वतः विरुद्ध लढा ठरतो.

## २) ) **विवाह आणि कुटुंबासंबंधी मार्क्सवादी दृष्टीकोन** (Marxist View)

"विवाह : मार्क्सवादी दृष्टीकोन" (Marriage : A Marxist View) या छोट्या लेखात एंगल्सने आपली मांडणी केली आहे. या लेखात एंगल्स आधी करार पद्धती आणि लग्नविषयक कायद्यांमधील त्रुटी दाखवितो, तसेच प्रचलित कायदेसुद्धा कसे पक्षपाती, पुरुषप्रधान आणि भांडवलशाहीवादी आहेत, ते कसे स्त्रियांचे शोषक आहेत, ते दाखवून देतो.

मार्क्सवादी विश्लेषणानुसार **स्वातंत्र्य** आणि **समता** ही जरी लोकशाहीवादी मूल्ये असतील (किंवा नसतील) तथापि या मूल्यांचा अतिशय निर्मम, निर्घृण वापर भांडवलशाहीने केवळ स्वतःसाठी करून घेतला आहे. उत्पादन व्यवस्थेत स्वस्त मजूर म्हणून स्त्री उपलब्ध होऊ शकते, हे लक्षात घेऊनच ही मूल्ये पुढे

---

12 Sheila Cronan *(writer, member of the radical feminist group The Redstockings)* "The Rise of Man: The Origins of Women's Oppression : One View- १९७० " या ग्रंथाची सहलेखिका

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com


---

आणण्यात आली. स्त्री-स्वातंत्र्य आणि स्त्री-समता या तत्त्वांचा केवळ स्त्री=शोषणासाठी पुरस्कार करण्यात आला. त्याचा गैरफायदा करार पद्धतीत जास्त प्रमाणात घेतला गेला, असे विश्लेषण मार्क्सवादाने केले आहे. **स्वतंत्र** आणि **समान** लोक निर्माण करणे, हे तर भांडवलशाहीचे प्रमुख कार्य होते. ते प्राथमिक काळात नकळत, अर्धवट जाणीवेतून घडले. त्याचवेळी चर्चच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी जी धार्मिक स्वातंत्र्याची चळवळ झाली, त्यात व्यक्तिला जर संपूर्ण स्वातंत्र्य असेल तरच तिला तिच्या सर्व कृतीना जबाबदार ठरविता येईल असा प्रसार करण्यात आला. पण त्याचे मूळ स्वरूप मात्र ' अनैतिक कृती करण्यासाठी सर्व प्रकारच्या बंधनांना विरोध करणे हेच नैतिक कर्तव्य आहे आणि विरोध करण्यासाठी स्वातंत्र्य मिळावे' असे होते.

लेनिनच्या मते, भांडवलशाहीचे स्वातंत्र्य आणि चर्चचे स्वातंत्र्य परस्परांना पूरक ठरले. म्हणजे असे की या काळात स्वतंत्र झालेला माणूस आर्थिकदृष्ट्या मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, श्रीमंत झाला. त्यास लेनिन 'बुर्ज्वा' (**bourgeois**) म्हणतो. हा 'बुर्ज्वा माणूस जे विवाह करू लागला त्यात धर्मगुरूच्या साक्षीने करार करण्यात येऊ लागले. पण त्याचे स्वरूपही शोषणाचे होते.

साधारणतः असे दिसते की, मजूर आणि मालक यांचे जे नाते असते तसे पत्नी-पती यांचे नाते असते. मजूर मालकाकडे काम मागतो तेंव्हा मालकाच्या मर्जीनुसार त्याला काम व मजुरी मिळते. मजुरी अपेक्षापेक्षा कमीच असते. हा तोंडी व्यवहार असतो. पण त्याच व्यवहाराला ***लेखी कराराचे म्हणजे कायद्याचे स्वरूप*** मिळाले की 'दोन्ही बाजू समान आहेत, दोन्ही बाजूंनी करारातील अटी व नियमांना मान्यता आहे', असे कायदा समजतो. हे वरवरचे स्वरूप असते. पण आत, वास्तवात सर्व अधिकार मालकाकडेच असतात आणि मजूर हक्कहीन असतो. मालक कायदेशीररीत्याच शोषक बनतो आणि मजूर शोषित बनतो. या वास्तवाशी कायद्याला काही देणेघेणे नसते. कायदा निष्ठुर बनतो.

'बुर्ज्वा विवाह होताना नेमके हेच होते. विवाह निश्चित झाला की त्या देशाचा कायदा कितीही प्रगतशील, सुधारक असो, त्यास विवाह संस्थेतील छुपे शोषण मान्य होते. मुलीची बाजू परंपरेने दुय्यम, पडती असते. पण विवाह ठरला की त्यांना समान समजण्यात येते आणि स्त्रीच्या शोषणाला कायदेशीर मान्यता मिळते. स्त्री-पुरुषामधील कायदेशीर विषमता ही पुरुषाकडून स्त्रीवर लादण्यात आलेल्या आर्थिक दडपशाहीचे कार्य असते, कारण नव्हे. प्राचीन काळी टोळीतील सर्व स्त्री-पुरुष एकत्र राहत असत, तेंव्हा स्त्रिया घरची कामे करीत होत्या त्यावेळी ती सामाजिक गरज होती. माणूस टोळी करून राहात असल्याने संपूर्ण टोळीसाठी अन्न पुरवठा करणे ही पुरुषाची सामाजिक जबाबदारी होती. हे **टोळीकुटुंब** होते. सर्वजण सर्वजणांची सेवा करीत असत, टोळीकुटुंब हे अशा रीतीने सार्वजनिक सेवाक्षेत्र होते.

पण 'बुर्ज्वा पुरुषप्रधानव्यवस्थेत हे वैशिष्ट्य नष्ट झाले. एकपत्नी आणि पुरुषप्रधानता यामुळे कुटुंबे व्यक्तिगत झाली आणि कुटुंब हे खासगी सेवाक्षेत्र' बनले. कुटुंबातील सारे सदस्य पत्नी, मुले ही पुरुषाची खासगी मालमत्ता झाली. साहजिकच स्त्री ही पुरुषाची मालमत्ता आणि कुटुंबाची **हक्काची मजूर** झाली. स्त्री सामाजिक उत्पादन व्यवस्थेबाहेर ढकलली गेलेली पहिली **'घरगुती मजूर'** बनली. ती घरात अडकली, कुटुंबाचे पालन-पोषण हेच तिचे सामाजिक आणि नंतर धार्मिक काम बनले ! दुसरीकडे मालकी पुरुषाची झाल्याने संपत्तीचा वारसा हक्क ही केवळ पुरुषाकडेच गेला. स्त्री लग्न करून दुसऱ्या पुरुषाकडे जाणार असल्याने तिला वाटा देण्याचे कारण उरले नाही.

पण जेंव्हा औद्योगिक क्रांतीची दुसरी लाट आली आणि उद्योग व्यवसायात मजुरांची, तीही स्वस्त मजुरांची गरज भासू लागली तेंव्हा 'स्त्रीचे स्वातंत्र्य' हा मुद्दा पुढे आला. कायद्यासमोर स्त्री 'स्वतंत्र आणि समान' मानली गेली. स्त्री कमावण्यासाठी म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी घराबाहेर पडली. यावेळी कुटुंब व्यवस्था ही वर्गव्यवस्था बनली. विवाह केवळ अशा आर्थिकदृष्ट्या बऱ्या, उच्च वर्गातच होऊ लागले. स्त्री कमावती झाली, उंबरठ्याबाहेर पडली तरी ती भांडवलशाहीने जखडून गेलेली ***मर्यादित स्वतंत्र*** स्त्री होती.

विवाहातील कराराच्या पारतंत्र्यात ती होती. पण याची समज तिला नव्हती. विवाह हा वर्गीय होता. कारण विवाह कागदोपत्री **स्वातंत्र्य** आणि **समता** पाळणारा असला तरी उत्पादन व आर्थिकदृष्ट्या नवे गुलाम निर्माण करणारा होता. प्रेमविवाह हा पुरुषाचे वर्चस्व प्रस्थापित करणारा ठरला, प्रेमविवाहात मानवी स्वातंत्र्याची, मानवी हक्काची घोषणा होती, पण ते फक्त पुरुषाला होते; स्त्रीला नव्हतेच, असे लेनिन निदर्शनास आणून देतो.



Vladimir Ilyich Ulyanov,
Alias Lenin
(April 22, 1870 –
January 21, 1924)
Russian communist revolutionary,
politician, and political theorist



इतर मानवी हक्कांपेक्षा हा मानवी हक्क वेगळा होता खरा, पण व्यवहारात या हक्काची मालकी केवळ पुरुषाची, बुर्ज्वा श्रीमंत वर्गाचीच राहिली. शोषित, दलित, मजूर, कामगार वर्ग मात्र या स्वातंत्र्य व समता या तत्त्वांपासून वंचित झाला. त्यामुळे त्याला, या वर्गातील स्त्रीला सुद्धा गुलामीतच राहावे लागले. गरीब ते गरीबच राहिले आणि श्रीमंत हे श्रीमंत होत गेले. प्रेमविवाह ही याच वर्गाची मालकीयत बनली. त्यांची एकाधिकारशाही बनली. अशा रीतीने विवाह व कुटुंब व्यवस्था या गोष्टी पुरुषी, शोषक आणि स्त्रीच्या गुलामगिरीचे कारण बनल्या. त्यात धर्म व्यवस्थेची शोषणाला मदत मिळून धर्मही शोषक बनला. स्त्रीचे विवाहातील स्वातंत्र्य हे भासमान स्वातंत्र्य ठरले.

लेनिनच्या, म्हणजे मार्क्सवादाच्या मते, विवाहातील संपूर्ण स्त्रीला (आणि पुरुषालाही) उपभोगावयाचे असेल तर भांडवलशाहीचे, त्यातील उत्पादन व्यवस्थेचे आणि भांडवलशाहीने निर्माण केलेली पुरुषी वारसाहक्क पद्धती, ती नाती यांचे समूळ, समग्र उच्चाटन होणे आवश्यक आहे. असे झाले तरच खऱ्या प्रेमावर आणि परस्परांच्या स्नेहावर आधारित विवाह पद्धती, कुटुंब व्यवस्था आणि समाज निर्माण होईल. कामभाव आणि प्रेम याच प्रेरणा विवाह आणि कुटुंबामागे असाव्यात, दुसऱ्या कोणत्याही असू नयेत. ज्यात प्रेम आहे तेच विवाह नैतिक मानावेत किंबहुना ज्यात नैतिकता आहे त्यात प्रेम वाहते राहते ! खरे तर विवाह ही व्यवस्थाच नसावी, मुलांची जबाबदारी घेणारी समाजव्यवस्था असावी. तोच अस्सल '**समाजवाद**' होय.

## ३) ) **विवाह आणि कुटुंबासंबंधी स्त्रीवादी दृष्टीकोन** (Feminist View)

विवाहाकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन मुख्यतः पुरुष वर्चस्ववादी होता आणि आहे. या पुरुषी वर्चस्वाचा भाग म्हणून विवाह हा एक धार्मिक विधी बनला.कारण धर्म ही रचना सुध्दा पुरुषीच आहे. सर्व धर्म, धर्मसंस्था व धर्मसंप्रदाय पुरुषांनीच निर्माण केलेली आहे तसेच धर्म ही परंपरा सुध्दा आहे कोणत्याही धार्मिक विवाह समारंभात ही पुरुष प्रधानता दिसून येते. विवाह ही मुख्यतः लैंगिक संबंध प्रस्थापित करणारी घटना असली तरी तिला धार्मिक तेचा साज चढवून मुख्यतः स्त्रीला पुरुषी वर्चस्वाखाली आणले गेले.

परंपरेने व धार्मिक परंपरेने सुध्दा स्त्री दुय्यम बनविली गेली.तिचा दर्जा पशुपातळीवर आणला गेला आणि समाजाच्या सर्व क्षेत्रात हा लिंगभेद व विषमता जाणीवपूर्वक जोपासली गेली. या सगळया पुरुषी वर्चस्वाला स्त्रीमुक्ती

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

चळवळ व स्त्रीवाद या तात्विक विचारधारांनी आव्हान केले. फ्रान्समधील 19 व्या शतकातील स्त्री मुक्ती चळवळ संपूर्ण युरोपात आणि पाश्चात्य राष्ट्रांत पसरली. नंतर 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात चीन व काही आफ्रिकन राष्ट्रे वगळता ती सर्वत्र रुजली. भारतातही ती आलेली आहे. ही स्त्रीवादी चळवळ विवाहाकडे व मानवी नाते संबंधाकडे एका वेगळया दृष्टिकोनातून पाहते हा दृष्टिकोन मुख्यतः दोन मुद्दयांवर आधारित आहे.



**एक**, - कुटुंब संस्थेची रचना परंपरेने पुरुष वर्चस्ववादी असून ती आता बदलली गेली पाहिजे.

**दोन**, - हा बदल लोकशाही स्वरूपाचा असला पाहिजे.कारण मुख्यतः आपण लोकशाही ही जीवनशैली स्विकारलेली आहे.

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधूता आणि समृध्दी ही पाच तत्त्वे लोकशाहीत गृहीत धरण्यात आलेली आहे. लोकशाही ही केवळ राजकीय बाब नाही तर कौटुंबिक जीवनशैली सुध्दा असली पाहिजे, असा आग्रह स्त्रीवाद धरतो.

कुटुंबाची रचना पुरुषकेंद्री असते. ती लोकशाहीवादी झाली पाहिजे याचा अर्थ ती स्त्रीकेंद्रवादी झाली पाहिजे ; असा नव्हे तर पती पत्नी व मुळे यांच्यात पारंपारीक लिंगभेदाने निर्माण केलेली विषमता नष्ट करुन त्या सर्वांमध्ये माणूस म्हणून समता व न्याय या दोन तत्त्वांची स्थापना करणे आवश्यक आहे, असे स्त्रीवाद सांगतो. लिंगभेदामुळे कुटुंबातील स्त्रीच नव्हे तर मुलांमधील मुलगी ही सुध्दा दुय्यम, शोषित, विषम वागणूक मिळणारी व्यक्ती असते आणि तेथूनच स्त्रीवरच्या विविध प्रकारच्या अन्यायाला सुरुवात होते. या सगळयाला आव्हान देऊन समता व न्याय या दोन तत्त्वांची स्थापना करण्याचे आव्हान स्त्रीवाद करतो.

**स्त्रीवादाचा पहिला मु-ा** म्हणजे कुटुंब व एकंदरीत समाजात लिंगभेदामुळे स्त्री पुरुषांच्या श्रमाच्या स्वरुपात पडणाऱ्या भेदाविषयीच अज्ञान स्त्री असणे हीच एक अंधश्रध्दा आहे. त्यामुळे एखादया व्यक्तीने स्त्री म्हणून जन्माला येणे याचा अर्थ विविध प्रकारच्या अंधश्रध्दांना बळी पडणे. लिंगभेदामुळे व समाजरचनेमुळे स्त्री-पुरुषांची श्रमविभागणी विषम व अन्यायी होते. स्त्रिया या गुलाम आणि दासी बनतात, तर पुरुष स्वामी बनतो.

श्रमविभागणीचे हे तत्त्व समतेवर आधारल्यास विवाह व कुटुंबाची रचना न्यायपूर्ण आणि लिंगभेद किमान पातळीवर आणणारी होय. एक चांगले जीवन जगता येईल असा विश्वास स्त्रीवादयांना वाटतो असे चांगले जीवन जगणे हे एक प्रकारचे आव्हान आहे. असे ते म्हणतात. यासाठी काय करावे लागेल ? तर 2 गोष्टी कराव्या लागतील पहिले म्हणजे लिंगभेद समाप्ती किंवा लिंगभेदापासून दूर जाणे आणि दुर्बलांना पुरेसे सर्व प्रकारचे संरक्षण त्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे :

**(अ) लिंगभेद समाप्ती :**

स्त्रीवादयांच्या मते कुटुंबातील लिंगभेद बालपणीच रुजविला जातो. मुलगा मुलगी असा भेद लहानपणापासून सुरु होतो. कारण मुले हा कुटुंबातील दुर्बल, असुरक्षित व परावलंबी घटक असतो. स्त्रीच्या शरीरातून मुख्यत्वे मुलांची निर्मिती होते. त्यामुळे साहजिकच माता आणि बालके दोघेही शारीरिक दृष्टया दुर्बल बनतात. मुल बराच काळ मुख्यत्वे आईवर अवलंबून असतो. पुढे त्याची सवय पुरुषांना होऊन पुरुष जवळपास मुलांची सर्व जबाबदारी स्त्रीवर ढकलतो. अशारितीने मुलांचे पालनपोषन हे श्रम कायमचे स्त्रीकडेच येतात.

केवळ बालसंगोपन ही श्रम विभागणी होत नाही तरी स्वयंपाक, धुणी भांडी, घराची निगा याही गोष्टी स्त्रीलाच कराव्या लागतात. शिवाय शिष्टाचार, धार्मिक विधी याही गोष्टींची जबाबदारी स्त्रीवरच ढकलली जाते. आणि अशारितीने श्रमविभागणीचे तत्व अन्यायीपध्दतीने वापरले जाऊन स्त्रीयांवर अधिकाधिक श्रम लादले जाते. म्हणून पहिले कामहे केले पाहिजे की, सामाजिक धीर धोरणे आणि कायदयानेच कोणताही सामाजिक स्वरुपाचा लिंगभेद नाकारला पाहिजे. त्याप्रमाणे मुलांच्या संगोपणाची श्रमविभागणी पती पत्नीने समान वाटून घेतली पाहिजे.

आता हे करण्यासाठी मुख्यतः कामाच्या ठिकाणाचे स्वरुप आणि कर्मचाऱ्यांना मिळणारी वागणूक बदलली पाहिजे. ती लिंगभेदरहीत स्वरुपाची केली पाहिजे. स्ती कर्मचाऱ्याना अपुरे / कमी वेतन, अधिक श्रम, मानहाणी याशिवाय लैंगिक छळालाही तांड दयावे लागते. यात भर म्हणू स्त्री गर्भवती राहिल्यास तिला कामावरुन कमी करणे आणि बाळंत झाल्यावर बाळासह येऊन कामाच्या ठिकाणी काम करावे लागते असे शोषणही होते. शिवाय बाळाची काळजी घेण्याची कोणतीही व्यवस्था मालकाने केलेली नसते.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

**(1) समता तत्त्वाचा अवलंब :**

कामाच्या ठिकाणाच्या स्वरुपातील बदल हा स्त्री-पुरुष समता या तत्त्वावर आधारलेला आणि स्त्री व पुरुष समता या तत्त्वावर आधारलेला आणि स्त्री व तिचे बाळ यांची काळजी घेणारा असला पाहिजे. यात अर्थातच बाळंतपणाची रजा, आर्थिक मदत, वैद्यकीय सेवा इ. पूरक साधनांची उपलब्धता गृहीत धरलेली आहे.



**(2) माता व पित्यालाही संगोपन रजा :**

संगोपनात आईबरोबरोबर वडीलांचाही सहभाग असावा म्हणून आई बरोबर वडीलांनाही संगोपन रजा देणे आवश्यक आहे. उदा. बालकाच्या पहिल्या वर्षात कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरुप जेष्ठता, तो हंगामी की कायम असा कोणताही भेदभाव न करता माता व पित्यास कमी काम देणे, कामाचे तास कमी करणे असेही उपाय केले पाहिजे. त्यात जर बालकाला काही गंभीर आजार किंवा समस्या असतील तर आणखी जादा सवलती दिल्या पाहिजे. याशिवाय ज्या स्त्री कर्मचाऱ्यांना मुलांना कामाच्या ठिकाणी आणावे लागते त्यांच्या साठी बालगृहे असली पाहिजे व तिथे स्वतंत्र कर्मचारी असले पाहिजे. त्यामुळे स्त्री-पुरुष कर्मचाऱ्यांना निर्धास्त राहून कामाकडे लक्ष देता येईल म्हणजेच त्यांची उत्पादन क्षमता वाढते.

**(3) शाळांची भूमिका :**

स्त्री-पुरुष लिंगभेदातील विषमता कमी करणे व न्याय व समता प्रस्थापित करणे या कामासाठी सरकारी निमसरकारी किंवा खाजगी शाळांची महत्वाची भूमिका आहे. थोडे अधिक निरीक्षण करता शाळांमधील शिक्षकात कनिष्ठ शिक्षकांमध्ये स्त्रियांचे प्रमाणे कमी असते. तसेच मुख्याध्यापक, प्राचार्य अशा अधिकाऱ्याच्या ठिकाणी बहुदा पुरुषच असतात. त्यामुळे मुलांवर नकळत स्त्री-पुरुष भेदाचेचे संस्कार लादले जातात. म्हणून शाळा काही गोष्टी करु शकते उदा :

1) शिक्षक व प्रशासक नेमताना स्त्री-पुरुष दोघांनाही प्राधान्य दयावे गुणवत्ता हा निकष असावा. लिंगभेद नाही.
2) विद्यार्थ्याच्या अभ्यासकमाची रचना अशी असावी की त्यांना लिंगभेदातील राजकारणाचे (The Politics of Jender / Sex ) प्रशिक्षण मिळावे. यात विषमता संदीग्धता, विवाह, कुटुंब, कामाच्या ठिकाणातील भेदभाव, वर्णभेद आणि या सर्वांचे परीणाम यांचा समावेश आढळतो.
3) लिंगभेद नियतीला आव्हान शाळा आणखी एक काम करु शकता ते म्हणजे केवळ स्त्री असल्यामुळे माझ्या नशीबी हे आले किंवा मला सगळे मिळाले पाहिजे कारण मी पुरुष आहे हा लिंगभेद नियतीवाद नाहिसा करण्याचे काम शाळा करु शकते. स्त्री-पुरुष समान आहे असे शिक्षण शाळा देऊ शकते.
4) अखेरीस / शेवटी शाळा करु शकता ते महत्त्वाचे काम म्हणजे शाळेच्या वेळा संपल्या नतर मुलांसाठी खेळघर, मुक्तांगण, अभ्यास जागा असे उपक्रम राबवून मुलांच्या वाढीला शाळा वाव देऊ शकते.

**(ब) दुर्बलांना संरक्षण :**

कुटुबातील दुर्बल घटक म्हणजे गृहिणी व मुले हा असतो. मुलांमध्येही मुली या आणखी दुर्बल घटक असतात. त्या दुर्बल असल्यासमुळे त्यांच्यावर वेगवेगळया प्रकारचा कौटुंबिक अन्याय होऊ शकतो. या अन्यायाची सुरुवात श्रमविभागणीच्या तत्त्वापासून होते. घराबाहेरचे श्रमपुरुष व घरातील श्रम गृहीणी व मुले यांच्यावर येऊन पडते. गृहीणीला नवरा, घर व मुले अशी तिहेरी जबाबदारी असते तर मुलांना शाळा व घरातील किरकोळ कामे अशी जबाबदारी असते. स्त्री व मुले आर्थिक दृष्टया उत्पादक घटक नसल्यामुळे त्यांना अधिक श्रम व विनामोबदला करावे लागतात.

म्हणून स्त्रीवादयांच्या मते कुटुंबाची रचना अशी असावी की ज्यातील श्रम विभागणीचे तत्त्व लिंगभेदा- - नुसार ठरणार नाही तर ही श्रमविभागणी सर्वाच्या समान अधिकार आणि जबाबदारीचे भान यावर ठरलेली असे की शिवाय आपण आर्थिक दृष्टया परावलंबी आहोत , असा भाव स्त्री व मुले यांच्यात निर्माण होणार नाही अशीही काळजी घेतली गेली पाहिजे .यासाठी घरात येणाऱ्या पैसा व इतर उत्पादनावर स्त्री व पुरुष या दोषांचाही कायदेशीर हक्क असला पाहिजे. स्त्रीचे घरातील श्रम हे सुध्दा खरे पाहता वेतन पात्र असले पाहिजे. म्हणजे नवऱ्याने बायकोला पगार दिला पाहिजे पण समजा कोणत्याही कारणामुळे ते शक्य नसले तरी घरातील काम हे बाहेरच्या कामासारखे महत्त्वाचे व आवश्यक आहे असे भानपुरुषाला असले पाहिजे. विशेषतः बालसंगोपण हे अतिशय महागडे व जबाबदारीचे काम आहे हे पुरुषाने मान्य केले पाहिजे. व त्याच प्रमाणे बाहेरचेही काम घरकामासारखेच महत्त्वाचे व आवश्यक आहे हे स्त्रीने मान्य केले पाहिजे.

**(क) विभक्तपणा व घटस्फोट :**

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com


पुरुषप्रधान संस्कृती कोणत्याही कारणांमुळे घटस्फोट झाल्यास किंवा पती - पत्नी वेगळे राहू लागल्यास त्याचा वाईट परिणाम स्त्रीवर पडतो. ती मिळवती नसल्यास विभक्तीकरणानंतर ती जवळपास भिकारीच होते. एकतर नाते संबंध तुटतात शिवाय आर्थिक हतबलता, सामाजिक कुचंबना, मुलांची जबाबदारी अशा तिहेरी कात्रीत स्त्री सापडते त्यामुळे कायदयाने आणि सामाजिक ध्येय धोरणांनुसार यात बदल झाला पाहिजे.

घटस्फोटित / विभक्त स्त्री पुरुषांना समाज हक्क व कर्तव्य असली पाहिजे स्त्रीने पुरुषाच्या उत्पादनावर अधिकार दाखवावा पण त्याला लुटु नये त्याचवेळी पुरुषाने स्त्री व मुले रस्त्यावर येणार नाहीत याची काळजी घ्यावी. म्हणजेच दोघाही पती पत्नीला समान जीवनशैली जगण्याची संधी उपलब्ध झाली पाहिजे व त्याचप्रमाणे दोघाचे व मुलांचेही योग्य पुनर्वसन झाले पाहिजे शिवाय मुलांना, माता-पित्यांना भेटण्याचा अधिकारही असला पाहिजे.

थोडक्यात विवाह व कुटुंबाची रचना समता, न्यायावर आधारलेली असली पाहिजे. ती योग्य हक्क व कर्तव्ये यांच्यावर आधारलेली पाहिजे. तरच राष्ट्रीय उत्पादन असलेल्या मुलांवर समतेचे व न्यायाचे संस्कार होऊ शकते. कुटुंब ही अशी जागा होईल की जिथे मुलांमध्ये म्हणजेच भावी नागरीकांमध्ये न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधूता, समृध्दी या सर्व मूल्यांची योग्य जोपासना होईल.

या पार्श्वभूमीवर आणि त्यातील मुद्द्यांच्या अनुषंगाने आता पुढील तीन समस्यांची चर्चा आपण पाहू.

## ६.२ वेश्याव्यवसाय, समलिंगी संबंध, आकस्मिक कामसंबध : कर्मठ आणि उदारमतवादी दृष्टीकोन

## ६.२.१ वेश्याव्यवसाय

### वेश्याव्यवसायाचे नैतिक स्थान

**1. वेश्या व्यवसाय म्हणजे काय ?**

वेश्या व्यवसाय म्हणजे स्त्रीने आपले शरीर पुरुषाला लैंगिक समाधानाकरीता काही वेळासाठी रोख पैसे, वस्तू किंवा अन्य साधनांच्या मोबदल्यात उपलब्ध करुन देणे आणि असे जगण्याची रित ही ' व्यवसाय ' म्हणून स्विकारणे. वेश्या व्यवसाय हा असा लैगिक संबंध आहे की ज्यात वेश्या आणि ग्राहक यांच्यात परस्पर संमतीचा काही काळापुरतीचा करार असतो. या लैंगिक संबंधात पुरुषाच्या दृष्टिकोनातून पाहता स्त्री महत्त्वाची नसते तर ' कोणीतरी स्त्री ' म्हणजेच ' कोणतीही स्त्री ' असते. तिचे स्त्री असणे , ती संभोगक्षम असणे , हेच महत्त्वाचे असते हा केवळ शुध्द शारीरिक व्यवहार असतो.

वेश्या व्यवसाय हा तत्त्वज्ञानाइतकाच जुना व्यवसाय आहे. वेश्या मुख्यतः स्त्रियाच असतात. कारण जगात सर्वत्र पुरुष प्रधान संस्कृती आहे. त्यामुळे पुरुषांच्या मनोरंजनाकरीता पुरुषांकडून पुरुषांमार्फत स्त्री देहाचा केला जाणारा व्यापार असे वेश्या व्यवसायाचे स्वरुप आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या परीभाषेत वेश्या व्यवसाय हा सुध्दा इतर अनेक व्यवसांयांचा व्यवसाय समजला गेला आहे. श्रीमंत पुरुष वर्गात शिक्षीत तरुणींकडून होणारा छुपा वेश्या व्यवसाय लोकप्रिय होता. वेश्या व्यवसाय हा एक अतिशय गंभीर समाजशास्त्रीय, अर्थशास्त्रीय, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक प्रकारचा रोग असूनही त्याकडे कोणत्याही देशाच्या सरकारचे व विचारवंताचे पुरेसे लक्ष गेलेले नाही.

**पुल्लिंगी ग्राहकवाद :**

पुल्लिंगी ग्राहकवाद म्हणजे पुरुषाच्या सुखासाठी स्त्रिया उपलब्ध असतात,सर्व सुखे केवळ पुरुषासाठीच असतात असे समजणे. सर्व सुखात काम सुख हे अनावर, उग्र आणि स्वरुपाचे असल्याने त्याविषयीची वासना सतत वाढती असते. त्यामुळे हे सुख केवळ पुरुषासाठीच आहे. पुरुष हाच सुखाचे स्वरुप, साधन आणि सुख विकत घेणारा व मालक असणारा असतो. असे पुल्लींगी ग्राहकवाद सांगतो.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com
---

**नैतिकदृष्टया वेश्याव्यसायात चूक काय आहे ?**

वेश्या व्यवसाय हा स्त्री पुरुष यांच्यातील एक प्रकारचा कामसंबंध आहे. साधारणतः स्त्रीया ह्याच वेश्या व्यवसायात असल्याचे आढळतात. याचे कारण पुरुष वर्चस्व प्रधान संस्कृती होय. वेश्या हा शब्दच स्त्रीसाठी वापरला गेला तो अर्थात पुरुषासाठीसुध्दा वापरला जाऊ शकतो पण पुरुष वेश्या असण्याचे प्रमाण अतिशय नगण्य असल्याने किंवा नसल्याने तो स्त्रीसाठीच वापरला गेला Prosptituition म्हणजे वेश्या व्यवसाय आणि Prosptitute किंवा Whore म्हणजे वेश्या होय.



वेश्या या शब्दाची व्याख्या करणे कठीण आहे. कारण वेश्या जे काम करते तेच पत्नी किंवा रखेल म्हणजे अंगवस्त्र करीत असते. पण रखेल आणि वेश्या यांच्यात फरक आहे रखेल (Courtsns) वेश्येला ज्या समस्यांना तोंड दयावे लागते त्या समस्या रखेली समोर येऊ शकत नाही. कारण ती सार्वजनिक जीवनात सामोरी येतेच असे नाही. ज्या पुरुषाची ती बाई असेल त्याच पुरुषासाठी आणि त्याने दिलेल्या सुरक्षित घरात ती असतात. उलट वेश्या ही सडाफटिंग, बाजारु शिवाय फसवणूक, चोरी, अमली पदार्थांचा व्यवसाय यांच्याशी संबंधीत असू शकते. वेश्येची व्याख्या करतांना अशाच वेश्या समोर ठेवाव्या लागतात. त्या व्याख्येतून ठेवलेल्या बाईलावगळावे लागते. जरी त्या दोघींचे काम एकच असते. व त्यांना सारखा मोबदला मिळतो. कायदा जेव्हा वेश्या व्यवसायासंबंधी विचार करतो तेव्हा तो बाजारु वेश्यांबाबतच बोलतो.

वेश्येची संकल्पनाही मुख्यतः शारीरीक कामसंबंधासाठी मोबदल्यावर काही काळासाठी तात्पुरती मिळणारी स्त्री अशा स्वरुपाची असते. पुरुषाचा वेश्येशी असलेला संबंध मुख्यतः लैंगिक संबंधच असतो. वेश्येशी येणाऱ्या कामसंबंधाचे स्वरुप विशिष्टय प्रकारचे असते. ते असे : हा काम संबंध मुख्यतः काही पैशाच्या मोबदल्यास असतो पण कुठलाही जुलूम, हिंसाचार नसलेला पण परस्पर संमतीने होणारा तो लैगिक व्यवहार असतो आणि दुसरे म्हणजे कसलेही प्रेम, ओढ किंवा ममत्व नसते. वेश्या प्रेमाखातर हे संबंध जोडत नाही. आणि ग्राहक सुध्दा वेश्याविषयी प्रेम असते म्हणून येतो; असे नाही तर तो त्या तात्पुरत्या लैंगिक संबंधांचे मूल्य देत असतो. ग्राहकांना एखादी विशिष्टच वेश्या हवी असते असे नव्हे तर ***कोणाबरोबर तरी*** त्यांना लैंगिक समाधान करुन घ्यावयाचे असते. मग तो पुन्हा कोणाबरोबर होता याच्याशी त्याचा संबंध नसतो.

थोडक्यात वेश्येबरोबरचा कामसंबंध पैशाच्या मोबदल्यात होणारा, तात्पुरता, प्रेम इ. नसलेला, शुध्द लैंगिक व्यवहार असतो. हा संबंध एस.टी.स्टँड, रेल्वे स्टेशन, बाग बगीचे, अन्य कोठे तरी थोडयाशा ओळखीवर आणि कधीही न भेटण्याच्या शक्यता गृहीत धरुन होणाऱ्या दोन स्त्री पुरुषांमधील संबंध असतो. मुख्यतः वेश्येशी येणारा संबंध हा सहमतीचा पण विनाप्रेमाचा व जुलमी नसणारा असा असतो.

आता वेश्या व्यवसायात किंवा या लैगिक संबंधात चुकीचे काय आहे ? यात अनैतिक काय आहे ? याचे कारण असे की, वेश्येकडे जाण्यामुळे रोगराई होईल किंवा आर्थिक नुकसान होईल किंवा बदनामी होईल म्हणून वेश्येकडे जाणे अनैतिक ठरते. असे नव्हे तर वेश्याकडून हे मूळात नैतिक व मुल्यात्मक दृष्टीकोनातून अंतर्गतरित्याच चुकीचे आहे कारण हा एक मुळात विवाहबाह्य संबंध आहे. वेश्या व्यवसायात अनैतिक आहे ते पारंपारिक दृष्टिकोनातून त्याची 3 कारणे पुढीलप्रमाणे :

**1) प्रेमाचा अभाव :**

लग्नातील लैगिक व्यवहार हा प्रेम भावनेवर आधारीत असतो. त्यामुळे तो जास्त उत्कट असतो आणि असाच संबंध योग्य व स्विकारण्याजोगा असतो आणि असाच संबंधातील लैगिक सुखात कसलेही प्रेम नसते. प्रेम नसलेल्या व्यक्तीबराबरच हा संबंध असल्यामुळे तो अनैतिक असतो. त्यामुळे त्याचा विचार करणेही चुकीचे आहे.

**2) बांधिलकीचा अभाव :**

वेश्या संबंधात कोणाशीही, कुणाचीही बांधीलकी नसते. जबाबदारी घ्यावयाची नसते. लग्नात मात्र आपण आपल्या सहचाराबरोबर त्याच्या सुख-दुःखात बांधील असतो. कारण आपल्या त्या व्यक्तीवर प्रेम करतो. प्रेम असणे म्हणजे बांधीलकी असणे. वेश्येबरोबर बांधीलकी नसते, कारण प्रेम नसते. म्हणून ते अनैतिक आहे.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com



**3) विवाहबंधन :**

आपले ज्याच्यावर प्रेम असते त्याच्याशिच लग्न करण्याची बांधीलकी असते आणि लग्नोत्तर लैंगिक संबंध हा जास्त सकस असतो. वेश्येबरोबर असे संबंध विकसीत करता येत नाही.

या 3 कारणांमुळे वेश्येशी होणारा लैंगिक संबंध आक्षेपार्ह ठरतो. कारण त्यात लग्न, प्रेम, बांधीलकी नसते. याचाच अर्थ प्रेम आणि काम यांच्यातील संबंध अतूट व अन्योन्य असला पाहिजे. हा संबंध लक्षात घेता वेश्या व्यवसायात अनैतिकता आहे. कारण तो विवाह बाह्य संबंध आहे.

अर्थात हा दृष्टिकोन सुध्दा पुरुषीच आहे , हा दृष्टिकोन पुरुषांच्या बाजूचा पक्षपाती आहे, मुळात ' समाजात वेश्या असणे हा सामाजिक आजार आहे ' असा विचार तो करीत नाही. त्यामुळे वेश्यांचे पुनर्वसन हा मुद्दाही त्यातून बाजूला पडतो. वेश्या व्यवसायाची निर्मिती ही पुरुषप्रधान आहे. ती पुरुषांच्या मनोरंजनासाठी आहे. यात चूक आहे' , असे मानले जात नाही हे दुर्दैवाचे आहे. दुर्देवाने गेल्य दशकापासून वेश्या व्यवसाय हा जगात भरघोस उत्पन्न देणारा व्यवसाय मानला जात असल्याने त्याला उलट मान्यता सुध्दा मिळू लागली आहे. कोरीया, मलेशिया, नेपाल, जपान इ. देशाचा तो मुख्य व्यवसाय होऊ पाहत आहे !

## ६.२ समलिंगी संबंध

### समलिंगी स्त्री-पुरुषांमधील समलिंगी संबंध.

कामनिती संबंधात ज्या 3 मुद्दयांची चर्चा आपण केली ते मुद्दे म्हणजे कामवासना आणि प्रेम यांच्यातील संबंध, वेश्या व्यवसायाचे नैतिक स्थान आणि समलिंगी कामसंबंध होय. "कामवासना आणि प्रेम यांच्यातील संबंध नैतिकच असला पाहिजे. आणि असा नैतिक संबंध केवळ विवाह संबंधानेच प्रस्थापित करता येतो" ही पारंपारिक भूमिक होय. ही भूमिका विवाहसंस्था आणि कुटुंबसंस्था यांचे नाते सांगणारी आहे. विवाह ही लैंगिक संबंध स्पष्ट करणारी सामाजिक संस्था तर कुटुंब ही समाजाचे अस्तित्व टिकवून ठेवणारी संस्था आहे असे त्यांचे स्वरुप आहे. समाज तेव्हाच अस्तित्वात येतो जेव्हा प्रजेची निर्मिती होते. त्यामुळे विवाह आणि कुटुंब यांचा अन्योन्य संबंध आहे.

वेश्या व्यवसाय ही विवाहबाह्य लैंगिक संबंधाची बाब आहे. त्यामुळे ती अनैतिक आहे, असा एक पक्ष आहे. अर्थात वेश्या व्यवसाय हे पुरुषप्रधान संस्कृतीचे फलित आहे.

कामनिती संबंधात तिसरा मुद्दा म्हणजे समलिंगी संबंध. विवाह हा स्त्री आणि पुरुष असा दोन्ही बाजूंनी होणारा लैंगिक संबंध आहे तर वेश्या व्यवसाय हा पुरुषांच्या बाजूने असणारा लैंगिक संबंध आहे. तर समलिंगी संबंध हा दोन समान लिंग असणाऱ्या व्यक्तींमधील संबंध आहे. या व्यक्ती पुरुष / स्त्रीया असू शकतात. समलिंगी म्हणजेच समान लिंग असणाऱ्या व्यक्ती. व त्यांच्यातील शरीर संबंध म्हणजे समलिंगी संबंध.

आता समलिंगी संबंधात काही तात्त्विक प्रश्न उपस्थित होतात. उदा. असे संबंध नैसर्गिक आहे की अनैसर्गिक आहे ? ते सामाजिक आहे समाजाविरुध्द आहे ? ते नैतिक आहे की अनैतिक आहे ? ते प्राकृतिक आहे की विकृत आहे ? या व अशा प्रश्नांसंबंधी पाश्चात्य राष्ट्रांनी बाजून आणि विरोधात खंडन मंडन म्हणून बाजू मांडण्यात आलेल्या आहे. व या संबंधाकडे निकोपदृष्टिने पाहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. काही पाश्चात्य व युरोपीयन राष्ट्रांमध्ये अशा संबंधात आणि विवाहांना कायदेशीर मान्यताही देण्यात आली आहे. काही राष्ट्रांमध्ये असे संबंध असणाऱ्यांचे क्लबही आहेत. त्यांना Gay Club असे नाव आहे.

समलिंगी संबंध या शब्दांसाठी इंग्रजीत दोन वेगळे शब्द आहेत. दोन पुरुषांमधील लैंगिक संबंधांसाठी Homosexual असा शब्द आहे. तर तो स्त्रीयांमधील लैंगिक संबंधासाठी Lsbian असा शब्द आहे. व त्याच्यापासूनच अनुक्रमे Homosexuality आणि इंग्रजीत Lesbianism असे शब्द बनतात. आपण मराठीत दोन्ही शब्दे समान अर्थाने वापरतो.

भारतात मात्र या संबंधाची चर्चा जाहीपणे काय पण छुपेपणे सुध्दा होत नाही. असे संबंध असू शकतात. याची कल्पनाही जनसामान्यांना जवळपास नसते. आणि असलीच असे संबंध विकृत आणि अनैसर्गिक - अनैतिक समजले जातात.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar

Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

कामसंबंध हे स्त्री पुरुषांमध्येच असतात. व ते विवाहानेच सिध्द करायचे असतात. अशी भारतीयांची धारणा आहे. पण गंमत म्हणजे हिंदू पुराणकथांमध्ये अनेक ठिकाणी अनेक ऋषींनी पशुसंभोग करीत असल्याची उदाहरणे आहे. समलिंगी संबंधावर दोन प्रकारे आक्षेप घेण्यात आलेले आहे. हे दोन दृष्टिकोन आहेत. या दोन्ही दृष्टिकोनांच्या मते समलिंगी संबंधांचा परीणाम नैतिकदृष्टया वाईट होतो म्हणून ते टाळले पाहिजे. हे दृष्टिकोन पुढीलप्रमाणे ः



**1) उदारमतवादी दृष्टिकोन ः**

पारंपरीकदृष्टया काम हा भारतीय जीवनात एक पुरुषार्थ मानला गेला आहे. पाश्चात्य विचार प्रणालीत सुध्दा याच स्वरुपाचा दृष्टिकोन आहे. दोन्ही दृष्टिकोनाचा साधारण आशय असा आहे की, माणसाने कामाची साधना प्रजोत्पादन आणि समाज धारणेचे तत्त्व म्हणूनच करावे. काम उपभोगतांना ज्या व्यक्तीवर आपले मनापासून प्रेम आहे त्याच व्यक्तीबरोबर काम उपभोग घ्यावा म्हणजेच प्रेम आणि काम यांचा संबंध अतुटपणे राहील. असे म्हणावे असे कामवर्तन हेच नैतिक वर्तन असा काम हाच चांगला काम होय.

तथापि या पारंपरिक दृष्टिकानास विरोध करणारा दृष्टिकोन आधुनिक काळात मांडण्यात आला तो दृष्टिकोन म्हणजे ***कामनितीविषयक उदारमतवादी दृष्टिकोन*** होय. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ब्रिटीश तत्त्वचिंतकांकडून उदारमतवाद मांडला गेला उदारमतवादयाच्या मते स्वातंत्र्य हे व्यक्तीचे सर्वोच्च मूल्य असले पाहिजे ते खरे तर समाजाचेच मूल्य असले पाहिजे तथापि ते एकदम समाजाकडून स्विकारले जावू शकणार नाही. त्याची सुरुवात व्यक्तीपासूनच झालेली आहे. स्वातंत्राबरोबर उदारमतवाद व्यक्तींची जबाबदारी हे मूल्यसुध्दा मांडतो त्यामुळे स्वातंत्र्य व जबाबदारी ही व्यक्तीमूल्ये प्रत्येक व्यक्तीने अंगीकारावी.

वरील मुल्ये जीवनाच्या सर्व क्षेत्रात अंगी कारली गेली पाहिजे. याचाच अर्थ ती काम जीवनातील वर्तनाविषयी सुध्दा प्रतिबिंबित झाली पाहिजे. व्यक्तीला काम उपभोग घेण्याचा नैसर्गिक हक्क आहे. पण त्याच बरोबर त्याची जबाबदारी सुध्दा त्याने घेतली पाहिजे. उदारमतवादयाच्या मते प्रजोत्पादन किंवा स्त्री-पुरुषांच्या परस्परांवरील प्रेमाचे प्रतिक म्हणून कामवर्तन असे त्याचे स्वरुप असता कामा नये. कामवर्तन हा सरळ स्वच्छ काम व्यवहार आहे आणि तसा काम व्यवहार असण्यात काहीही चूक नाही. काम वासना नैसर्गिक आहे. हे लक्षात ठेवून कामाचा स्विकार केला पाहिजे. कामसंबंध हे स्वच्छपणे शारीरिक संबंध असतात. कामइच्छेची अटच मुळात शारीरीक संबंधही असते आणि अशी इच्छा प्रगट करणे यात चूक काहीही नाही. विवाह ही उघडच शारीरीक संबंधाची बाब असते पण परंपरा, धर्म, संस्कृती या सगळयांच्या दडपणांमुळे या संबंधाला विनाकारण धार्मिक स्वरुप येते.

कामभावनेला एक स्वतःचेच काममूल्य आहे हे खरे की काम क्रिडेत आपल्या शरीराबरोबर आपले मनही गुंतलेले असते. म्हणून कामाचे मूल्य मानसिकही असते. काम संबंध आणि प्रेम यांच्यातील संबंध हा आवश्यकरित्या असलाच पाहिजे असे नाही. तो असेल तर उत्तम आणि विवाहात प्रेम आहे की नाही हा मुद्दा गौर होतो. तथापि दोन स्त्री-पुरुषांमधील काम संबंध हा जसा पूर्ण खाजगी असतो तसा त्यांचा प्रेमसंबंधही खाजगी असतो. विवाहात प्रेमाकडे दुर्लक्ष होते. तेथेसुध्दा दोन शरीरांचा संबंध ऐवढेच सत्य राहते. त्यामुळे कोणत्याही दोन व्यक्तींमध्ये परस्पर अनुमतीने होणारा काम संबंध हा योग्यच म्हटला पाहिजे. मग त्यांचा विवाह होवो अथवा न होवो.

थोडक्यात, उदारमतवादयांच्या मते काम संबंध हा उघडच शारीरीक संबंध असून तो परस्पर सहमतीने होणे हे नैतिक आहे. ते कामाचे मूल्य आहे. त्या सहमतीत प्रेम आणि मूल्यांची भर पडू शकते. तो काम अधिक सशक्त व दर्जेदार होऊ शकते पण ती अट नाही. अशा काम संबंधात निर्माण होणारे मूल ते दाम्पंत्य आनंदाने स्विकारु शकते. या अपत्याची निश्चित काळजी घेता यावी यासाठी विवाह केला जाऊ शकतो. म्हणजे विवाह ही अपत्य संगोपणाची कायदेशीर जबाबदारी एवढयाच स्वरुपाची आहे. यात अर्थातच एकाही व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस साधन म्हणून वापरता कामा नये. प्रेममय शारिरिक संबंध ही अधिक चांगली गोष्ट असते. हे खरे. पण तीसुध्दा अट नाही. त्यामुळे दोन व्यक्ती शुध्द कामसंबंधासाठी एकत्र येऊ शकतात. आणि समजुतदारपणे दुर राहू शकतात.

कर्मठ दृष्टीकोन

या दृष्टिकोनानुसार समलिंगी संबंध हा वाईट आहे कारण त्यातून केवळ दुःख निर्माण होते. हा दृष्टिकोन प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ व सम्राट जस्टीनियन याने मांडला त्याच्या मते समलिंगी संबंधामुळे दुष्काळ, भूकंप, प्लेग सारखे साथीचे रोग

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9158658066, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

फैलावतात. त्यामुळे तो टाळला पाहिजे समलिंगी संबंध हा दुःखदायक आहे. कारण त्याने दुःख निर्माण होते. आणि दुःख देणारी गोष्ट अनैतिक असते.

हा दृष्टिकोन तितकासा साधा दृष्टिकोन नाही तो भावनिक स्वरुपाचा आहे. तो दुःखदायक आहे, असे म्हणण्याचे कारण समलिंगी संबंधाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला तर हा संबंध सुध्दा आनंददायक होवू शकतो. म्हणून पाश्चात्य राष्ट्रांत गेल्या काही शतकात सामाजिक व कायदेशीर मान्यता या संबंधाला मिळाली आहे.



**अनैसर्गिक संबंध :**

हा दृष्टिकोन मुख्यतः रोमन कॅथेलिक पंथाचा प्रणेता असलेला सेंट थॉमस ॲक्वीनस या मध्युगीन 12 व्या शतकात तत्त्वज्ञान मांडला. त्याच्या मते प्रत्येक मानवी कृतीला काही तरी निश्चित व नैसर्गिक हेतू असतो. तो हेतु पूर्ण होईल अशा पध्दतीनेच आपण वागले पाहिजे. काम वानेमागे सुध्दा असाच हेतु आहे. कोणता ? तर प्रजोत्पादन आणि त्या मुलांचे संगोपन म्हणून प्रत्येक काम वासनेचा व्यवहार हा मूल निर्मीती करणारा असला पाहिजे आणि मुलांचे संगोपण करण्यासाठी आवश्यक असलेली सामाजिक परीस्थिती सुरक्षित ठेवणारा असला पाहिजे.साहजिकच असा संबंध स्त्री-पुरुष यांच्यामध्येच असतो. समलिंगी संबंधात तो नसतो.

ॲक्वीनासच्या मते प्रजोत्पादन आणि समाज संवर्धन या कारणासाठीच व्यक्तीने कामनांद घेतला पाहिजे. त्याचा हा दृष्टिकोन धार्मिक स्वरुपाचा आहे कामाकडे धार्मिक कृती म्हणूनच पाहावे कारण ईश्वराने हे जग व माणसाची निर्मिती काही विशिष्ट हेतूनेच केली आहे. तो हेतू म्हणजे ईश्वराची भक्ती व ईश्वराची शरणता हाच असला पाहिजे. ईश्वराने माणूस निर्माण केला तो त्यासाठीच. म्हणून माणसानेही पुढच्या माणसाची निर्मिती याच हेतूसाठी केली पाहिजे.

माणसाला हेतू आहे, त्याच्या अख्ख्या व्यक्तिमत्वाला हेतू आहे व तो म्हणजे व्यक्ती उघडच माणसाच्या प्रत्येक अवयवालाही हेतू आहे. कानाचा हेतू ऐकणे, डोळ्याचा पाहणे, नाकाचा गंध अनुभवणे इ. तसा इतर सर्व अवयवांना हेतू आहे. तसा तो आपल्या लैगिक अवयवांनाही आहे. स्त्री पुरुषांची शरीरे परस्परांच्या हेतुसाठीच आहे. त्यामुळे दोघांचेही लैंगिक इंद्रिये परस्परांसाठीच आहे ते त्यांचे प्रयोजन होत. आणि संभोगात म्हणजे विवाहात ते प्रयोजन सिध्द होते.

या दृष्टिकोनाचा स्विकार करतांना ॲक्वीनास फक्त स्त्री पुरुषांमधीलच संबंधाला मान्यता देतो. साहजिकच हस्तमैथून, गर्भनिरोधक, प्रतिरोधके समलिंगी संबंध यांना तो मान्यतो देत नाही. असे करणे हे त्याच्या मते अनैतिक आहे.

**टीका**

ॲक्वीनासच्या या दृष्टिकोनावर मुख्यतः दोन टीका करण्यात आलेल्या आहे. त्या अशा :

**1) हेतूची कल्पना अस्पष्ट :**

निसर्गातील प्रत्येक घटनेला, मानवी कृतीला आणि एकंदरीत या विश्वाला हेतू आहे हे ॲक्वीनासचे म्हणणे फारसे स्पष्ट होऊ शकत नाही. विश्वाला हेतू आहे म्हणजे काय हे कळत नाही.

**2) आदर्श अपरिहार्य नाही :**

समजा विश्वाला व मानवी हेतूला हेतू आहे आणि कामवासनेचा हेतू प्रजोत्पादन हा मान्य केला तरी निपजणारी प्रजा नैतिक वागेल, ईश्वराचीचं भक्ती याची शाश्वती कशावरुन ? ते निश्चित नाही. कारण अनेकजण अनैतिक कृती करतांना आढळतात. अनैतिक, बेकायदेशीर असा व्यवहार जगात असण्याचे आपणांस आढळतो. म्हणून ॲक्वीनासचा दृष्टिकोन स्विकारता येणार नाही.

**Thomas Aquinas**,
(1225 –1274)
Italian Catholic priest,
Influential philosopher and theologian.
also known as
The "*Doctor Angelicus*"
And "*Doctor Communis*



---